प्रेस नोट                दिनांक ०५/०७/२०२१

| | |
|---|---|
| अॅसीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | श्री राजेश इंदल गुसिंगे, वय- ३७ वर्षे, तलाठी सजा निवळी, ता.जि. रत्नागिरी, रा. घर नं ७८३, प्रज्ञानंद निवास, श्रीनगर, मुपो. खेडशी ता. जि. रत्नागिरी, |
| घटनेचे ठिकाण | तलाठी सजा निवळी यांचे कार्यालय, निवळी ते जयगड रोड, रावणंगवाडी, निवळी तिठा जवळ, ता. जि. रत्नागिरी. |
| मागितलेली लाच रक्कम | लोकसेवक आरोपी यांनी २,०००/-रुपये |
| तडजोडीअंती मागणी केलेली लाच रक्कम | लोकसेवक आरोपी यांनी १,५००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | लोकसेवक आरोपी यांनी रू. १,५००/- रूपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांची व त्यांची मयत आई यांचे सयुक्तिक नावाने मौजे भोके गावात जमिन आहे. तक्रारदार यांनी त्यांचे मयत आईचे नाव सातबारा उताऱ्यावरून कमी करणेसाठी तलाठी सजा निवळी यांचे कार्यालयाकडे अर्ज केला होता. लोकसेवक श्री. गुसिंगे, तलाठी सजा निवळी यांनी तक्रारदार यांच्या मयत आईचे नाव सातबारा उताऱ्यावरून कमी करण्याची नोंद मंजूर करण्यास पुढे पाठविणेसाठी व सातबारा उतारा देणेसाठी २,०००/-रुपये लाचेची मागणी केली असल्याने तक्रारदार यांनी वरील लोकसेवक यांचेविरुध्द दिनांक ०२/०७/२०२१ रोजी लाचेची मागणी केल्याची लेखी तक्रार दिलेली आहे.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०५/०७/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये तलाठी श्री. गुसिंगे यांनी तक्रारदार यांच्या मयत आईचे नाव सातबारा उताऱ्यावरून कमी करण्याची नोंद मंजूरीकरीता पुढे पाठविणेसाठी व सातबारा उतारा देणेसाठी २,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती १,५००/- रूपयाची मागणी करून ती स्विकारण्याचे मान्य केले.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार दिनांक ०५/०७/२०२१ रोजी सापळा आयोजित केला असता, लोकसेवक श्री. राजेश गुसिंगे यांनी तक्रारदार यांचेकडे लाच रक्कमेची मागणी करून १,५००/-रुपये लाच रक्कम स्विकारलेनंतर त्यांना १७.२२ वाजताचे सुमारास तलाठी सजा निवळी ता. जि.रत्नागिरी येथील कार्यालयात पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील कमांकावर संपर्क साधावा.

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893
Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharastra.gov.in
Mobile App :- www.acbmaharastra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB

5/7/2021

(प्रविण कदम)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी